2 1 FEB 2026 सकाळ, जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात उद्या भरणार नोकरी महामेळावा

## आठ हजार जागांच्या भरतीसाठी होणार मुलाखती; १२५ कंपन्यांचा सहभाग

कोल्हापूर, ता. २० : शिवाजी विद्यापीठाचा मध्यवर्ती रोजगार कक्ष, डॉ. ज्ञानेश्वर मुळे फाउंडेशन आणि विद्यापीठ विकास मंच यांच्यातर्फे रविवारी (ता. २२) विद्यापीठात सकाळी नऊ ते सायंकाळी पाच या वेळेत राज्यस्तरीय नोकरी महामेळावा भरणार आहे. उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते सकाळी दहा वाजता या महामेळाव्याचे उद्‍घाटन होईल.

यावेळी माहिती व तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्यमंत्री आशीष शेलार प्रमुख उपस्थित असतील, अशी माहिती प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

या महामेळाव्यात १२५ हून अधिक नामांकित राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय कंपन्यांचा सहभाग निश्चित झाला असून, साधारण दहा हजार युवक, युवती उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे. अभियांत्रिकी, व्यवस्थापन, वाणिज्य, विज्ञान, कला, कायदा, फार्मा, नर्सिंग तसेच इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना थेट मुलाखतीद्वारे रोजगार संधी उपलब्ध होणार आहेत.

### आवश्यक कागदपत्रे

■ आठवीपासून पीएच.डी.पर्यंत अशी कोणत्याही प्रकारची शैक्षणिक पात्रता धारण केलेल्या, अनुभवी तसेच सर्व प्रकारच्या अभ्यासक्रमांना प्रवेशित अंतिम वर्षात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी नोकरीच्या संधी उपलब्ध असतील. इच्छुक उमेदवारांनी नोकरी महामेळाव्यास उपस्थित राहात असताना सोबत आपला बायोडाटा, शैक्षणिक व अनुभवाच्या सर्व कागदपत्रांच्या प्रतींचे किमान पाच संच आणि पासपोर्ट आकारातील छायाचित्रे सोबत ठेवावीत. एका उमेदवाराला जास्तीत जास्त तीन कंपन्यांसाठी मुलाखती देता येऊ शकतील.

उद्योगजगत, शैक्षणिक संस्था व विद्यार्थी यांच्यातील दुवा अधिक बळकट करण्यासाठी हा मेळावा प्रभावी ठरणार असल्याचे डॉ. जाधव यांनी सांगितले. 'आजपर्यंत या मेळाव्यासाठी विद्यापीठाच्या वेबसाईटवरील लिंकद्वारे सुमारे ४५०० उमेदवारांनी नोंदणी केली आहे. जागेवर नोंदणी आणि थेट मुलाखतीसाठीही उमेदवार उपस्थित राहू शकतात', असे मध्यवर्ती रोजगार कक्षाचे समन्वयक डॉ. सुभाष कोंबडे यांनी सांगितले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विद्यापीठ विकास मंचचे स्वागत परुळेकर उपस्थित होते.

21 FEB 2026

पुढारी

# ऑनलाईन जर्नालिझम कोर्सच्या माजी विद्यार्थ्यांचा आज मेळावा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या वतीने सुरू असलेल्या पी. जी. डिप्लोमा इन ऑनलाईन जर्नालिझम कोर्सच्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा शनिवार, दि. २१ रोजी आयोजित केला आहे. अध्यासनाच्या इमारतीमध्ये सकाळी ११ वाजता मेळाव्याला सुरुवात होईल. मेळाव्यात विविध विषयांवर तसेच आगामी काळात माजी विद्यार्थ्यांना घेऊन राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पाबद्दल चर्चा करण्यात येणार आहे. सर्व माजी विद्यार्थ्यांनी मेळाव्याला उपस्थित राहावे, असे आवाहन अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.

21 FEB 2026

तरुण भारत

# ‘संशोधन प्रकल्प निधी’वर आज कार्यशाळा

**कोल्हापूर :** विविध संशोधन प्रकल्पांसाठी लागणारा निधी कसा मिळवायचा, मिळणाऱ्या निधीचा योग्य वापर कसा करायचा आणि त्याची नितीमानता या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळा आज ९ ते २ यावेळेत शिवाजी विद्यापीठात आयोजित करण्यात आली आहे, अशी माहिती डॉ. किरणकुमार शर्मा यांनी दिली.

2 1 FEB 2026
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात आज 'अकौंटन्सी म्युझियम ऑफ इंडिया'चे उद्घाटन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागात शनिवारी (दि. २१) सकाळी ९.३० वाजता अकौंटन्सी म्युझियम ऑफ इंडियाचे उद्घाटन होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी असणार आहेत. प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्यासह इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटंट ऑफ इंडियाचे पश्चिम विभागीय परिषदेचे चेअरमन सीए केतन सैया, कोल्हापूर शाखेचे चेअरमन सीए नितीन हरगुडे आणि कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांची प्रमुख उपस्थिती असेल. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाचे प्रमुख डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले आहे.

21 FEB 2026

तरुण भारत

# आज अकौंटन्सी म्युझीयम ऑफ इंडियाचा प्रारंभ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागात आज 'अकाऊंटन्सी म्युझियम ऑफ इंडिया"चे उद्घाटन करण्यात येणार आहे. अध्यक्षस्थानी प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी असणार आहेत, अशी माहिती विद्यापीठाकडून देण्यात आली.

21 FEB 2026

सकाळ

# 'अकौंन्टन्सी म्युझियम ऑफ इंडिया'चे आज उद्‌घाटन

कोल्हापूर : विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागात शनिवारी (ता. २१) सकाळी साडेनऊ वाजता 'अकाऊंटन्सी म्युझियम ऑफ इंडिया'चे उद्‌घाटन होणार आहे. कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी अध्यक्षस्थानी असतील, तर प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्यासह इन्स्टिटयूट ऑफ चार्टर्ड अकौंन्टंन्ट ऑफ इंडियाचे पश्चिम विभागीय परिषदेचे अध्यक्ष सीए केतन सैया, कोल्हापूर शाखेचे अध्यक्ष सीए नितीन हरगुडे आणि डॉ. विलास शिंदे प्रमुख उपस्थित राहतील.

21 FEB 2026
पुण्यनगरी

# विद्यापीठात उद्या नोकरी महामेळावा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा मध्यवर्ती रोजगार कक्ष, डॉ. ज्ञानेश्वर मुळे फाऊंडेशन व विद्यापीठ विकास मंच यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दि. २२ रोजी विद्यापीठात राज्यस्तरीय नोकरी महामेळावा आयोजित केला आहे. उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते सकाळी १० वाजता या महामेळाव्याचे उद्घाटन होणार असून, यावेळी माहिती व तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्यमंत्री आशीष शेलार यांची प्रमुख उपस्थिती असेल, अशी माहिती प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी पत्रकार परिषदेत दिली. महामेळाव्यात १२५ हून अधिक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय कंपन्यांचा सहभाग निश्चित झाला असून, साधारण १०,००० युवक-युवती उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे.

21 FEB 2026
जनप्रवास
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'संशोधन प्रकल्प निधी कसा मिळवावा' वर कार्यशाळा

## नवोन्मेषी संशोधन आणि विकासाला चालना : शिवाजी विद्यापीठासही सहा कोटींचे अनुदान प्राप्त

**जनप्रवास : कोल्हापूर**

विविध संशोधन प्रकल्पांसाठी लागणारा निधी कसा मिळवायचा, मिळणाऱ्या निधीचा योग्य वापर कसा करायचा आणि त्याची नितीमानता' या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळा शनिवारी सकाळी ९ ते २ या वेळेत शिवाजी विद्यापीठात आयोजित केली आहे, अशी माहिती विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड बायोटेक्नॉलॉजीचे संचालक डॉ. किरणकुमार शर्मा यांनी दिली.

प्रा. शर्मा यांनी दिलेल्या माहितीनुसार, ही कार्यशाळा शिवाजी विद्यापीठ तसेच संलग्न महाविद्यालयांतील प्राध्यापक व संशोधक विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त असून ती केवळ पहिल्या १५० नोंदणीकृत सहभागींसाठीच आहे. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, बंगळूर येथील विश्वविख्यात शास्त्रज्ञ डॉ. अशोक रायचूर यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन होईल. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी असतील, तर प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांची प्रमुख उपस्थिती असेल.



कार्यशाळेमध्ये 'संशोधनासाठी निधी कसा प्राप्त करावयाचा' याविषयी डॉ. रोहित कुमार, 'संशोधन प्रकल्प कसा लिहावा' याविषयी डॉ. विक्रम जयराम, 'विज्ञान आणि तंत्रज्ञानातल्या संशोधनातील योग्य नितीमत्ता' याविषयी डॉ. टी. ए. अभिनंदन मार्गदर्शन करणार आहेत. त्याशिवाय, डॉ. आदित्य सधनाला, एएनआरएफ-पेअर उपक्रमाच्या आयआयएससी-एसयूके स्पोकचे समन्वयक डॉ. सचिन रॉन्डीया हे देखील मार्गदर्शन करतील.

कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी डॉ. कल्याणराव गरडकर, डॉ. किरण पवार, डॉ. तुकाराम डोंगळे आणि प्रकाश यादव यांच्यासह त्यांचे सहकारी परिश्रम घेत आहेत.

### प्रत्येक हबला १०० कोटी रुपयांचा निधी

भारतातील नवोन्मेषी संशोधन आणि विकासाला चालना देण्याच्या दृष्टीने केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाच्या अत्यंत महत्त्वाकांक्षी अशा एएनआरएफ-पेअरच्या हब अँड स्पोक उपक्रमांतर्गत शिवाजी विद्यापीठ देशातील आघाडीच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, बंगळूर या हबशी स्पोक म्हणून जोडले गेले आहे. देशात अशा एकूण ३२ हब्जची नियुक्ती करण्यात आली असून त्यापैकी केवळ सातच हब्जना कॅटेगरी-ए म्हणून गणले गेले आहे. या कॅटेगरीतील प्रत्येक हबला १०० कोटी रुपयांचा निधी प्रदान करण्यात आला आहे. याअंतर्गत शिवाजी विद्यापीठासही सहा कोटी रुपयांचे अनुदान प्राप्त झाले आहे, अशी माहिती शर्मा यांनी दिली.

21 FEB 2026

जनप्रवास

# विद्यापीठात आज 'अकौन्टन्सी म्युझियम ऑफ इंडिया'चे उद्घाटन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागात शनिवार, २१ रोजी सकाळी ९.३० वाजता 'अकौन्टन्सी म्युझियम ऑफ इंडिया'चे उद्घाटन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी असतील, तर प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्यासह सीए केतन सैया, कोल्हापूर शाखेचे चेअरमन सीए नितीन हरगुडे आणि कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांची प्रमुख उपस्थिती असेल. या उद्घाटन समारंभासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाचे प्रमुख डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले आहे.

21 FEB 2026

तरुण भारत

# विद्यापीठात उद्या नोकरी महामेळावा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा मध्यवर्ती रोजगार कक्ष, डॉ. ज्ञानेश्वर मुळे फाऊंडेशन आणि विद्यापीठ विकास मंच यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या रविवारी दि.२२ रोजी विद्यापीठात राज्यस्तरीय नोकरी महामेळावा आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती प्रभारी प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी शुक्रवारी झालेल्या पत्रकार परिषदेत दिली.

डॉ. जाधव म्हणाल्या, राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते सकाळी १० वाजता उद्घाटन होणार आहे. यावेळी माहिती व तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. शिवाजी विद्यापीठात सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत हा महामेळावा चालणार आहे. महामेळाव्यात १२५ हून अधिक नामांकित राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय कंपन्यांचा सहभाग निश्चित झाला असून साधारण महा हजार युवक, युवती उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे.

21 FEB 2026
लोकमत

# विद्यापीठात उद्या आठ हजार जागांसाठी नोकरी महामेळावा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा मध्यवर्ती रोजगार कक्ष, डॉ. ज्ञानेश्वर मुळे फाउंडेशन आणि विद्यापीठ विकास मंचातर्फे उद्या रविवारी (दि. २२ फेब्रुवारी) विद्यापीठात सकाळी ९ सायंकाळी ५ वाजेपर्यंत राज्यस्तरीय नोकरी महामेळावा होत आहे. तिथे आठ हजार जागांसाठी मुलाखती होणार आहेत. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते सकाळी १० वाजता या महामेळाव्याचे उद्घाटन होणार आहे. माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार प्रमुख उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, मध्यवर्ती रोजगार कक्षाचे समन्वयक डॉ. सुभाष कोंबडे आणि विद्यापीठ विकास मंचचे स्वागत परुळेकर उपस्थित होते.

या महामेळाव्यात १२५ हून अधिक नामांकित राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय कंपन्यांचा सहभाग निश्चित झाला असून, साधारण १० हजार युवक, युवती उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे. मेळाव्यात राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील आघाडीच्या कंपन्यांचाही समावेश आहे. विविध क्षेत्रांतील रोजगार संधी एकाच व्यासपीठावर उपलब्ध करून देणारा हा उपक्रम राज्यातील विशेषतः शिवाजी विद्यापीठासह संलग्नित महाविद्यालयांमधील आणि कोल्हापूर, सांगली व सातारा या जिल्ह्यांतील पात्र तरुणांसाठी अत्यंत उपयुक्त ठरेल, असा दावा विद्यापीठाने केला.



## आठवी ते पीएच.डी.

नोकरी महामेळाव्यात विविध क्षेत्रांतील आठ हजार जागा भरतीसाठी उपलब्ध असून आठवीपासून पीएच.डी.पर्यंत अशी कोणत्याही प्रकारची शैक्षणिक पात्रता धारण केलेल्या, अनुभवी तसेच सर्वप्रकारच्या अभ्यासक्रमांना प्रवेशित अंतिम वर्षात शिक्षण घेणारे विद्यार्थी यांच्यासाठी नोकरीच्या संधी उपलब्ध असतील.

## साडेचार हजार विद्यार्थ्यांची नोंदणी...

आजपर्यंत या मेळाव्यासाठी विद्यापीठाच्या वेबसाइटवरील लिंकद्वारे सुमारे ४५०० उमेदवारांनी नोंदणी केली असून जागेवर नोंदणी आणि थेट मुलाखतीसाठीही उमेदवार उपस्थित राहू शकतात. विद्यापीठाने २५ अधिविभागांमध्ये ७५ मुलाखत कक्षांची उपलब्धता केली असून, एकाच वेळी तेथे १५० उमेदवारांच्या मुलाखती घेता येणार आहेत.